# Yashoda Girls' Arts & Commerce College, Nagpur

## Department of History

## Assignment

## Session: 2021 – 2022

INDEX

Name: Madhuri R. Wankhade Sub.:

Std.: B.A 1st year Div.: Roll No.: 40

| Sr. No. | Date | Title | Page No. |
|---|---|---|---|

Sub : History

Name : Madhuri R. Wankhade

class : B.A. 1st year (2nd Sem)

Mobile : 9146896679

College : Yashoda Girls arts & Commerce college

Email id : Wankhademadhuri6@gmail.Com

Session - 2021 - 022

SEAL

# छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक

Page No.______ Date: __/__/__

छत्रपती शिवाजीराजे भोसले यांच्या राज्याभिषेकाची तयारी कितीतरी महिने अगोदरच सुरू झाली होती. राज्याभिषेकासाठी निश्चित अशी कोणती परंपरा नव्हती. प्राचीन परंपरा आणि राजनीतीवरील ग्रंथातून काही विद्वानांनी प्रथा-परंपरांचा अभ्यास केला. शिवराज्याभिषेकासाठी देशातील कानाकोपऱ्यातून ब्राम्हणांना आमंत्रण देण्यात आले होते. लोक मिळून जवळपास लाखभर लोक रायगड या ठिकाणी जमा झाले होते. चार महिन्यांसाठी त्यांची राहण्याची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. रोज त्यांना मिष्टान्नाचे जेवन असे. सरदार राज्यातील श्रीमंत गणमान्य व्यक्ती, दुसऱ्या राज्यांचे प्रतिनिधी, विदेशी व्यापारी आणि सामान्य जनता असे सर्वच या सोहळ्यात उपस्थित झाले होते. प्रत्येक दिवशी एका धार्मिक विधित आणि संस्कारात शिवाजी महाराज गढून गेले होते. राजे शिवाजी यांनी सर्वप्रथम आपली आई जिजाबाईना नमस्कार केला. त्यांचे आशीर्वाद घेतले.

त्यानंतर महाराजांनी विविध मंदिरात जाऊन देवर्शन केले. देवके दर्शन घेतले. पूजा केली. आणि ते रायगडाला 12 मे

1674 ला परत आले. तुळजापुरला भवानी मातेच्या दर्शनासाठी त्यांना जाणे शक्य नव्हते. म्हणून चार दिवसांनी ते प्रतापगडवरील प्रतिष्ठापना केलेल्या भवानीमाता देवीच्या दर्शनासाठी गेले. त्यावेळी सव्वा मण सोन्याची छत्री भवानी मातेस अर्पण केली. 21 मे ला पुन्हा रायगडावर ते धार्मिक विधित गुंतुन गेले. महाराजांनी 28 मे ला प्रायश्चित केले. जानवे परिधान केले. दुसऱ्या दिवशी दोन राण्यांबरोबर पुन्हा विवाह विधी केला. त्यावेळी गागाभट्टांना 7000 होन तर इतर सर्व ब्राम्हणांना मिळून 17000 होन दक्षिणा दिली.

दुसऱ्या दिवशी महाराजांची सोने, चांदी, तांबे, जस्त, कथील, शिसे आणि लोखंड अशा सात धातुंनी वेगवेगळी तुला झाली. त्याशिवाय वस्त्र, कापुर, मीठ, खिळे, मसाले, लोणी, गुळ, फळे इत्यादींच्या तुला झाल्या.

6 जुन 1674 ला राज्याभिषेक झाला. या दिवशी पहाटे उठुन, मंत्रोच्चार आणि संस्कारांबरोबर आंघोळ करुन, कुलदेवतेला स्मरुन राज्याभिषेक सुरु झाला. गागाभट्ट आणि इतर

Page No.
Date : / /

ब्राह्मणांना यावेळीही आभूषणे आणी वस्त्रे भेट देण्यात आली. यावेळी शिवाजी महाराजांनी शुभ्र वस्त्र परिधान केले होते. गळ्यात फुलांच्या माळा घातलेल्या होत्या. राज्याभिषेकात राजाचा अभिषेक आणी डोक्यावर छत्र धरणे हे दोन प्रमुख विधि होते. दोन फुट लांब आणी दोन फुट रुंद असा सोन्याने मढवलेल्या मंचावर शिवाजी महाराज बसले, शेजारी उपरण्याला साडीचे टोक बांधलेली सोयराबाई दुसऱ्या मंचावर. तर बालसंभाजीराजे थोडेसे मागे बसले होते.

अष्टप्रधानांतील आठ प्रधान गंगेसारख्या विविध नद्यांतून आणलेले पाण्याचे जलकुंभ घेऊन उभे होते. त्यानंतर ते जलकुंभांनी शिवाजी महाराजांवर अभिषेक केला. त्यावेळी मंत्रोच्चारण आणी आसमंतात विविध सुरवाद्य निनादत होते. सोळा सुवासिनींनी पंचारती ओवाळली. त्यानंतर शिवाजी महाराजांनी लाल रंगाचे वस्त्र परिधान केली. जडजवाहिर, अलंकार परिधान केले. गळ्यात फुलांचे हार घातले. एक राज मुकुट घातला. आपल्या ढाल तलवार आणी धनुष्यबाणाची पुजा केली. मुहूर्ताच्या वेळी राजसिंहासनाच्या दालनात प्रवेश केला.

SEAL

Page No.______
Date : __/__/__

राज्याभिषेकाच्ये दालन हिंदू परंपरेनुसार 32 शकुन चिन्हांनी सजवलेले होते. सभासदबखर म्हणते त्याचप्रमाणे 32 मण सोन्याचे 14 लाख रूपये मुल्य असलेले भव्य सिंहासन सोन्याच्या पत्र्याने मढवलेले होते.. शिवाजी महाराज सिंहासनावर आरूढ झाले. सोळा सवाष्णींनी त्यांना ओवाळले. ब्राम्हणांनी मोठ्या स्वरात मंत्रांचे उच्चारण केले प्रजेनी महाराजांना आशीर्वाद दिला. 'शिवराज की जय' 'शिवराज की जय' च्या घोषणा दिल्या गेल्या सोन्याचांदीची फुले उधळली गेली. विविध तालवाद्य सुरवाद्यांच्या जयघोषात आसमंत भरून गेले. ठरल्याप्रमाणे प्रत्येक गडावरून तोफा डागल्या गेल्या. मुख्य पुरोहित गागा भट्टानी पुढे येवुन राजांच्या डोक्यावर मोत्याची झालर ठेवत 'शिवछत्रपती' म्हणून उच्चार केला. राजे शिवाजी महाराजांनी सर्व जनांना खुप धन भेट म्हणून दिले. त्यांनी एकुन सोळा प्रकारचे महादान केले त्यानंतर विविध मंत्रीगणांनी सिंहासनापुढे जाउन राजांना अभिवादन केले.

छत्रपतींनी त्यांना या प्रसंगी विविध पदे, नियुक्तीपत्रे, धन, घोडे, हत्ती, रत्ने, वस्त्रे, शस्त्रे दान केली.

Page No.______
Date : / /

हे सर्व सकाळी आठ वाजेपर्यंत संपले. समारंभ संपल्यावर शिवाजी महाराज पाहिल्यांदा एका देखण्या घोड्यावर स्वार होऊन जगदीश्वराच्या मंदिराकडे गेले. तिकडुन हत्तींवर स्वार होऊन त्यांची मिरवणुक रायगडावर निघाली. इतर दोन हत्तींवर जरीपटका आणि भगवा झेंडे घेऊन सेन्याचे प्रतिनिधी होते. सोबत अष्टप्रधान आणी इतर सैन्य होते. रायगडावर हि मिरवणुक जात असतांना सामान्य जनांनी फुले, चुरमुरे उधळले दिवे ओवाळले, रायगडावरील विविध मंदिरांचे दर्शन घेऊन महाराज महालात परतले.

SEAL

Good

Principal
Keshoday Girls Arts & Commerce
College, Sadh Nagar, Nagpur-15